**आजचे पंचांग**

दिनांक : ४ सप्टेंबर २०२६ वार : शुक्रवार माह (अमावस्यांत) : श्रावण माह (पूर्णिमांत) : भाद्रपद ऋतु : शरद आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : अष्टमी तिथी (५ सप्टेंबर रात १२:१३ पर्यंत) त्यानंतर नवमी तिथी नक्षत्र : रोहिणी नक्षत्र (रात्री ११:०३ पर्यंत) त्यानंतर मृगशीर्ष नक्षत्र योग : हर्षण योग (दुपारी ०३:४३ पर्यंत) त्यानंतर वज्र योग करण : बलवा करण (दुपारी ०१:२० पर्यंत) त्यानंतर कौलव करण

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर २०२६ वर्ष - १ अंक - ३३७ पाने - ४ पुणे/पिंपरी-चिंचवड


**व्हॉट्सअ‍ॅप स्टेटसवरून राजकीय वाद पेटला**

**पुणे :** जुन्नर तालुक्याच्या पूर्व भागात सोशल मीडियावरील एका व्हॉट्सअ‍ॅप स्टेटसने राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. सार्वजनिक कामाच्या ठिकाणी झालेल्या वादात ग्रामपंचायत सदस्याला मारहाण झाल्याच्या आरोपात करण्यात आला आहे. या घटनेनंतर संबंधित सदस्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, आळेफाटा पोलीस ठाण्यातही काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

# हक्कासाठी न्यायालयाची पायरी का?

## अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांचे अनुदान रोखणाऱ्या व्यवस्थेला उच्च न्यायालयाचा चपराक!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : वृत्तसंस्था**

अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी असलेले सरकारी अनुदान मिळवण्यासाठीही न्यायालयाचे दरवाजे ठोठावावे लागत असतील, तर ही केवळ प्रशासकीय चूक नाही; ती सामाजिक न्यायाच्या संकल्पनेलाच लागलेली गंभीर ठेच आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या ताज्या निर्णयाने सरकारच्या यंत्रणेतील याच विसंगतीवर बोट ठेवले आहे. नोंदणीकृत ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांमधील अंतर्गत वाद हे अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे शासकीय अनुदान रोखण्याचे कारण होऊ शकत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

'बालाजी युवक मंडळ' या नोंदणीकृत ट्रस्टला अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी निवासी आश्रमशाळा चालविण्यासाठी केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाकडून अनुदान मंजूर झाले होते. मात्र, ट्रस्टच्या दोन पदाधिकाऱ्यांमधील कायदेशीर वादाचे कारण पुढे करत तब्बल ११ वर्षांचे अनुदान रोखण्यात आले. परिणामी वाद ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांचा असताना त्याची शिक्षा विद्यार्थ्यांना का, हा मूलभूत प्रश्न निर्माण झाला.

न्यायमूर्ती किशोर सी. संत आणि न्यायमूर्ती अजित बी. कादेठाणकर यांच्या खंडपीठाने सरकारच्या भूमिकेला स्पष्ट शब्दांत धक्का दिला. ट्रस्टमध्ये



अंतर्गत वाद असला तरी त्याचा थेट फटका विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला देणे योग्य ठरू शकत नाही. ट्रस्टच्या कामकाजात कोणतीही ठोस त्रुटी किंवा प्रतिकूल शेरा नसताना केवळ पदाधिकाऱ्यांमधील वादाच्या आधारावर निधी रोखणे अयोग्य असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

न्यायालयाने केंद्र सरकारला प्रलंबित ११ वर्षांचे अनुदान वितरित करण्याचे आदेश दिले. हा निर्णय केवळ एका ट्रस्टपुरता मर्यादित नाही. सरकारी योजनांचा लाभ मिळवताना अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना कोणत्या प्रकारच्या प्रशासकीय अडथळ्यांना सामोरे जावे लागते, याचे हे ज्वलंत उदाहरण आहे.

सामाजिक न्यायाच्या नावाने योजना जाहीर करायच्या, निधी मंजूर करायचा आणि नंतर कागदपत्रे, चौकशा, अंतर्गत वाद किंवा प्रशासकीय कारणे पुढे करून तो निधी वर्षानुवर्षे अडकवायचा हा कारभार नेमका कोणाच्या हिताचा? विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा की सरकारी फाइलशाहीचा?

आज प्रश्न केवळ बालाजी युवक मंडळाचा नाही. सरकारच्या योजनांवर हक्क असलेल्या अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना प्रत्येक वेळी आपला अधिकार सिद्ध करण्यासाठी न्यायालयात धाव घ्यावी लागणार असेल, तर शासनाच्या सामाजिक न्यायाच्या धोरणाची परिणामकारकता कुठे उरते?

हक्क मिळवण्यासाठी न्यायालयात जाणे हा नागरिकांचा अधिकार आहे; पण हक्क मिळवण्यासाठी प्रत्येक वेळी न्यायालयात जावे लागणे, ही सरकारच्या व्यवस्थेची नामुष्की आहे.

## सारांश वृत्त

### माजी सनदी अधिकारी आशिष जोशी यांच्या सोशल मीडिया पोस्टवरून खळबळ; दिल्ली पोलिसांकडून ९ तास चौकशी!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली / वृत्तसंस्था : माजी अतिरिक्त सचिव आणि सेवानिवृत्त सनदी अधिकारी आशिष जोशी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'द' (ट्विटर) वर केलेल्या एका खळबळजनक दाव्यानंतर राजधानीत राजकीय वातावरण तापले आहे. या प्रकरणी दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने आशिष जोशी यांना ताब्यात घेऊन त्यांची तब्बल ९ तास चौकशी केली.नेमके प्रकरण काय आहे?जंतर-मंतर आंदोलन आणि वादग्रस्त पोस्ट: जंतर-मंतर येथे झालेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान पोलिसांनी केलेल्या लाठीचार्ज आणि अश्रूधुराच्या वापरामुळे भावुक होऊन आशिष जोशी यांनी १३ ऑगस्ट रोजी 'द' वर एक पोस्ट लिहिली होती.अमित शाह यांच्याशी संबंधित दावा: जोशी यांनी आपल्या पोस्टमध्ये असा दावा केला होता की, जंतर-मंतरवरील पोलीस कारवाईच्या मुद्द्यावरून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि केंद्रीय गृहसचिव गोविंद मोहन यांच्यात तीव्र मतभेद झाले होते. गृहसचिव आणि काही कनिष्ठ अधिकारी विद्यार्थ्यांवर इतक्या तीव्र कारवाईच्या विरोधात होते, असा दावा जोशी यांनी अंतर्गत सूत्रांच्या हवाल्याने केला होता. पोलिसांची कारवाई आणि चौकशी:ट्वीट भारतात प्रतिबंधित: केंद्र सरकारच्या कायदेशीर मागणीनंतर आशिष जोशी यांचे हे 'द' वरील वादग्रस्त ट्वीट भारतात ब्लॉक करण्यात आले होते.९ तासांची चौकशी: २ सप्टेंबर रोजी सकाळी आशिष जोशी नेहमीप्रमाणे दिल्लीतील नेहरू पार्कमध्ये फिरत असताना, साध्या वेशातील पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांना न्यू फ्रेंड्स कॉलनीतील स्पेशल सेलच्या कार्यालयात नेऊन रात्री ७ वाजेपर्यंत चौकशी करण्यात आली आणि नंतर घरी सोडण्यात आले.दाखल झालेला गुन्हा: पोलिसांनी त्यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या (बीएनएस) कलम १९२ (दंगल भडकवण्याच्या उद्देशाने चिथावणी देणे) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

## पत्रकारांच्या आरोग्याची 'काळजी' की राजकीय स्टंट? फडणवीसांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई / प्रतिनिधी**

विधानभवनात पार पडलेले पत्रकारांचे आरोग्य तपासणी शिबीर आणि मुख्यमंत्र्यांचे कौतुकोद्गार पाहता वरवर सगळे काही आलबेल वाटते. पण, ज्या राजकारणात पत्रकारांना केवळ 'माहिती पुरवणारे साधन' किंवा 'वापरा आणि फेकून द्या' अशा वस्तूच्या स्वरूपात पाहिले जाते, तिथे देवेंद्र फडणवीसांच्या तोंडून अचानक आलेली पत्रकारांच्या आरोग्याची कळवळा खरीच प्रामाणिक आहे का, हा संशोधनाचा विषय बनला आहे. आपल्या संपूर्ण राजकीय कारकिर्दीत आणि मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात पत्रकारांच्या मूलभूत हक्कांवर, त्यांच्या नोकरीच्या सुरक्षेवर किंवा आर्थिक विवंचनेवर कधीही ठोस पावले न उचलणारे फडणवीस अचानक 'आरोग्यदूत' म्हणून कसे पुढे आले?

गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातील पत्रकारितेचे चित्र अत्यंत भयावह झाले आहे. कॉर्पोरेट मिडियाच्या नावाखाली हजारो पत्रकारांना वेळेवर वेतन मिळत नाही, हजेरीचे कोणतेही नियम नाहीत, आणि कंत्राटी पद्धतीमुळे नोकरीची कोणतीही शाश्वती उरलेली नाही. कोविड काळात आणि अनेक मोठ्या दुर्घटनांच्या वेळी जिवाची बाजी लावून काम करणाऱ्या पत्रकारांना उपचारासाठी वणवण करावी लागल्याची शेकडो उदाहरणे डोळ्यांसमोर आहेत. अशा ज्वलंत वास्तवाकडे दुर्लक्ष करून, केवळ एक दिवसाचे आरोग्य शिबीर भरवणे आणि त्यातही 'मुख्यमंत्री सहायता निधी'चा राजकीय बंभोब करणे, म्हणजे गंभीर समस्यांवर मलमपट्टी करण्याचा केविलवाणा प्रयत्न वाटतो.

जर खरोखरच शासन पत्रकारांच्या आरोग्याबद्दल आणि सुरक्षिततेबद्दल गंभीर असते, तर आज पत्रकार सुरक्षा कायद्याची अंमलबजावणी कागदावर राहिली नसती. पत्रकारांवरील हल्ले रोखण्यासाठी कडक कायदे अमलात आणण्यात सरकारला आलेले अपयश लपवण्यासाठी अशा प्रकारच्या इव्हेंटबाजीचा वापर केला जात असल्याचा संशय बळावतो. कॅमेऱ्यासमोर पत्रकारांच्या पाठीवर हात ठेवणारे नेते, प्रत्यक्षात पत्रकारांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम करत आहेत हा आजवरचा इतिहास आहे.

केवळ निवडणुका किंवा प्रसिद्धीच्या झोतात राहण्यासाठी आरोग्य तपासणीचे फलक झळकवणे सोपे असते, पण पत्रकारांना कायमस्वरूपी आरोग्य विमा, पेन्शन योजना आणि हक्काचे घर देण्याबाबत हेच सरकार नेहमी मूग गिळून का बसते? जोपर्यंत पत्रकारांचे शोषण करणाऱ्या व्यवस्थांना आळा घातला जात नाही आणि त्यांच्या हक्कांची पायमल्ली थांबवली जात नाही, तोपर्यंत अशा शिबिरांना केवळ 'राजकीय मलमपट्टी' किंवा 'इव्हेंट' यापेक्षा वेगळे काहीही म्हणता येणार नाही. मुख्यमंत्र्यांचा हा तथाकथित जिव्हाळा खऱ्या अर्थाने प्रामाणिक आहे की केवळ जनमानसात प्रतिमा उजळवण्याचा फंडा, याचा हिशोब आता पत्रकार आणि जनता दोघांनीही मागण्याची वेळ आली आहे.

## मनोज जरांगेंच्या उपोषणाला पाठिंबा; बीडमध्ये बाजारपेठ बंद, मराठा आंदोलकांची दुचाकी रॅली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बीड / प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली. या आवाहनाला प्रतिसाद देत गुरुवारी बीड शहरातील व्यापारी, शाळा, महाविद्यालये आणि नागरिकांनी बंदमध्ये सहभाग घेतला. शहरातील प्रमुख बाजारपेठांमध्ये अनेक दुकाने बंद ठेवण्यात आल्याने दिवसभर शांतता दिसून आली.

बंदच्या पार्श्वभूमीवर मराठा आंदोलकांनी शहरातून दुचाकी रॅली काढून नागरिक आणि व्यापाऱ्यांना बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. ही रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यापासून सुरू झाली. शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण केल्यानंतर रॅलीची सांगता छत्रपती शिवाजी महाराज चौकातील शिवतीर्थ येथे झाली.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जरांगे पाटील यांनी उपोषण सुरू केले असून, राज्य सरकारकडून आंदोलनाची अपेक्षित दखल घेतली जात नसल्याचा आरोप



आंदोलकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती.

मुक्ताई मार्गावरील मुख्य बाजारपेठेसह शहरातील विविध भागांमध्ये व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवून आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. रॅलीदरम्यान आंदोलकांनी आंदोलन शांततेच्या मार्गाने करण्याचे आवाहन केले. बीड शहराबरोबरच जिल्ह्यातील विविध भागांतही बंदला प्रतिसाद मिळाल्याचे चित्र होते. त्यामुळे मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर पुन्हा एकदा बीडमध्ये आंदोलनाची तीव्रता वाढताना दिसून आली.

## सण-उत्सवातील महाप्रसादही आता एफडीएच्या रडारवर; तुकाराम मुंढेंचा 'झिरो टॉलरन्स' आदेश!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई / प्रतिनिधी :**

सण-उत्सव म्हटले की महाप्रसाद, लंगर, भंडारा आणि विविध खाद्यपदार्थांचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. याच गर्दीचा फायदा घेत अन्नभेसळ करणाऱ्यांवर आता अन्न व औषध प्रशासनाने (ऋअ) थेट कारवाईचा बडगा उगारला आहे. एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी 'स्टँडिंग ऑर्डर्स फॉर ऑल फेस्टिव्हल्स' लागू करत वर्षभरातील सर्व प्रमुख सणांसाठी कायमस्वरूपी तपासणी आणि कारवाईची यंत्रणा उभी केली आहे.

या आदेशानुसार महाप्रसादाच्या ठिकाणी प्रत्यक्ष तपासणी केली जाणार असून मिठाई, खवा, पनीर, तूप, सुकामेवा तसेच मटण-चिकन यांसारख्या मागणी वाढणाऱ्या पदार्थांवर विशेष लक्ष ठेवले जाणार आहे. सणाच्या २१ दिवस आधीपासून कारवाई सुरू होऊन सणानंतर ३० दिवसांपर्यंत मोहीम सुरू राहणार आहे.

एफडीएची ही मोहीम चार टप्प्यांत राबवली जाणार आहे. पहिल्या टप्प्यात जोखमीच्या अन्नपदार्थांचे नकाशांकन, विशेष पथकांची नियुक्ती आणि प्रयोगशाळांना पूर्वसूचना दिली जाईल. दुसऱ्या टप्प्यात गिरण्या, घाऊक बाजारपेठा, वाहतूक आणि पहाटेच्या नाका तपासण्यांवर भर असेल. तिसऱ्या टप्प्यात सणाच्या दिवशी भरारी पथकांकडून अचानक तपासणी केली जाईल. चौथ्या टप्प्यात दोषींविरुद्ध कायदेशीर कारवाई आणि न्यायालयीन खटले दाखल केले जातील. गणेशोत्सव, नवरात्र, दिवाळी, ईद, ख्रिसमस आणि नववर्ष पूर्वसंध्या हे राज्यव्यापी सण; मकरसंक्रांत, महाशिवरात्र, होळी, गुढीपाडवा, वारी, जन्माष्टमी, दहीहंडी आदी प्रादेशिक



सण; तर जत्रा, पालखी सोहळे आणि उरूस स्थानिक सण म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहेत.

ई-कॉमर्स, आयातीत खाद्यपदार्थ, बेकरी आणि पॅकबंद पाण्यावरही नजर ठेवली जाणार आहे. सणाच्या नावाखाली नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांना पाठीशी न घालता कारवाई करण्याचा इशारा या आदेशातून देण्यात आला आहे. आता उत्सवाच्या आनंदात भेसळीचा विषारी घास मिसळणाऱ्यांवर एफडीएची नजर किती कठोर राहते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## शैक्षणिक विस्कळीतपणा की धोरणात्मक अनास्था? प्राध्यापक भरतीचा खेळखंडोबा; लाखो बेरोजगार तरुणांच्या भविष्याशी खेळ!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अयोध्या / वृत्तसंस्था**

राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमध्ये गेली कित्येक वर्षे रखडलेली प्राध्यापक भरती प्रक्रिया पुन्हा एकदा कायदेशीर कचाट्यात सापडली आहे. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल झालेल्या याचिकेमुळे डिसेंबरपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण होण्याबाबत तीव्र शंका निर्माण झाली असून, यामुळे राज्य सरकारच्या कार्यक्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. एकीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार उच्च शिक्षणात आमूलाग्र बदलांच्या वल्गना करत असताना, दुसरीकडे धोरणातील स्पष्ट व स्थिर भूमिकेचा अभाव आणि प्रशासकीय अनास्थेमुळे हजारो पात्र तरुण पदभरतीपासून वंचित राहत आहेत.

काय आहेत भरती रखडण्याची प्रमुख कारणे?

वारंवार बदलणारे निकष: उच्च व तंत्रशिक्षण विभागाने सुरुवातीला गुणांचे सूत्र ८०-२० ठरवले. त्यावर आक्षेप आल्यावर ७५-२५ आणि नंतर पुन्हा बदल करून ६०-४० असे निकष जाहीर करण्यात आले. सरकारच्या या लहरी व धरसोड वृत्तीमुळे संपूर्ण भरती प्रक्रिया संशयाच्या भोवऱ्यात अडकली.

प्रशासनाचे अपयश: युजीसीच्या (UGC) मार्गदर्शक तत्त्वांचा अभ्यास न करता घाईघाईने नियम बनवल्यामुळे शैक्षणिक संघटनांना न्यायालयात धाव




घ्यावी लागली, ज्याचे खापर आता सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांच्या भविष्यावर फुटत आहे.

कायदेशीर पेच: ऐन मुलाखतींच्या टप्प्यावर उच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्याने निवड याद्यांवर अंतरिम संकट ओढवले आहे, ज्यामुळे सरकारच्या सुनावणी व धोरणनियोजनातील त्रुटी उघड्या पडल्या आहेत.

राज्यातील लाखो उच्चशिक्षित तरुण एम.फिल., पीएच.डी. आणि नेट-सेट परीक्षा उत्तीर्ण होऊन वर्षानुवर्षे मार्गदर्शकाविना आणि हक्काच्या नोकरीविना वणवण भटकत आहेत. शिक्षणाचा कणा मानल्या जाणाऱ्या विद्यापीठांमध्येच जर नियमित प्राध्यापक नसतील, तर विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे काय, हा गंभीर सवाल आहे. केवळ कागदी घोडे नाचवून आणि घोषणाबाजी करून उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारणार नाही. देवेंद्र फडणवीस सरकारने या प्रकरणी तातडीने कायदेशीर बाजू भक्कम करून मार्ग काढणे गरजेचे आहे, अन्यथा राज्याची युवा पिढी आणि शिक्षण क्षेत्र उद्ध्वस्त होण्यास वेळ लागणार नाही.

## संपादकीय

### फडणवीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री की हिंदी राजभाषेचे महाराष्ट्रातील सूत्रधार?

महाराष्ट्राची राजधानी मुंबई आणि तिच्या वेशीवरची नवी मुंबई. गणेशोत्सवाचा पहिला दिवस. आणि याच दिवशी केंद्र सरकारचे 'हिंदी दिवस' तसेच सहावे अखिल भारतीय राजभाषा संमेलन! १४ आणि १५ सप्टेंबरला वाशीतील सिडको प्रदर्शन केंद्रात होणाऱ्या या कार्यक्रमाला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह उपस्थित राहणार असल्याचे अधिकृत राजभाषा विभागाच्या नोंदीत स्पष्ट आहे. देशभरातून अधिकारी, साहित्यिक आणि प्रतिनिधी या कार्यक्रमासाठी येणार आहेत.

केंद्र सरकारला हिंदीचा प्रचार करायचा आहे, त्यासाठी राजभाषा संमेलन घ्यायचे आहे, याला घटनात्मक आणि प्रशासकीय चौकट आहे. त्यावर आक्षेप घेण्याचे कारण नाही. पण मुंबईच्या वेशीवर, गणेशोत्सवाच्या प्रारंभी आणि सध्याच्या मराठी-अमराठी वादाच्या पार्श्वभूमीवरच या कार्यक्रमाची निवड का? हा प्रश्न विचारला तर तो हिंदीविरोध ठरत नाही. तो महाराष्ट्राच्या राजकीय संवेदनशीलतेचा प्रश्न ठरतो. आणि या प्रश्नाच्या केंद्रस्थानी आहेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. फडणवीस सरकार एकीकडे मराठीला महाराष्ट्राची राज्यभाषा म्हणून प्रतिष्ठा देण्याची भाषा करते. दुसरीकडे मुंबईतील अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी शिकण्याची अट लागू करण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्याची अंमलबजावणी पुढे ढकलते. २७ ऑगस्टला फडणवीस यांनी अशा चालकांना मराठी शिकण्यासाठी आणखी एक वर्षाची मुदत दिली. आता त्याच सरकारच्या काळात मुंबईच्या दारात हिंदीच्या राजभाषा संमेलनासाठी केंद्राला भव्य व्यासपीठ उपलब्ध होते. याहून मोठा राजकीय विरोधाभास कोणता? पण गोष्ट इथेच थांबत नाही. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी महाराष्ट्र सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांसाठीची हिंदी भाषा परीक्षा रद्द केली. शासनानेच स्पष्ट केले की महाराष्ट्रात मराठी ही शासकीय कामकाजाची भाषा आहे आणि सध्याच्या प्रशासनात हिंदीचा वापर अत्यंत नगण्य आहे. हा निर्णय ७ मे २०२६ पासून लागू करण्यात आला आहे. म्हणजे एका बाजूला महाराष्ट्र सरकार म्हणते हिंदीची सरकारी कर्मचाऱ्यांसाठी परीक्षा आता आवश्यक नाही. दुसऱ्या बाजूला मुंबईच्या वेशीवर केंद्र सरकार हिंदी राजभाषेचे राष्ट्रीय संमेलन भरवत आहे. मग नेमकी दिशा कोणती? मराठीला प्राधान्य की हिंदीला राजकीय अवकाश? सरकारने याचे उत्तर द्यावे. हिंदी ही भारतीय भाषांपैकी एक महत्त्वाची भाषा आहे. तिचा द्वेष करण्याचे कारण नाही. महाराष्ट्राने हिंदी भाषिक नागरिकांना स्वीकारले आहे, रोजगार दिला आहे, उद्योग दिले आहेत, सांस्कृतिक व्यासपीठ दिले आहे. त्यामुळे हा प्रश्न 'हिंदी विरुद्ध मराठी' असा करून महाराष्ट्राला पुन्हा भाषिक संघर्षाच्या खाईत ढकलणे चुकीचे ठरेल. हिंदीचा सन्मान आणि मराठीचे राजकीय दुय्यमीकरण यात जमीन-अस्मानाचा फरक आहे. मुंबई बहुभाषिक आहे; पण तिची प्रशासकीय आणि प्रादेशिक ओळख महाराष्ट्राशी जोडलेली आहे. मुंबईत गुजराती, हिंदी, उर्दू, इंग्रजी, दक्षिण भारतीय आणि देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या असंख्य भाषिक समुदायांनी आपापली ओळख जपली. हीच मुंबईची ताकद आहे. परंतु बहुभाषिकता म्हणजे स्थानिक भाषेचे विस्थापन नव्हे. मग प्रश्न असा मराठीचा सन्मान राखून हिंदीचे संमेलन मुंबईत घेणे शक्य नव्हते का? नक्कीच शक्य होते. मग त्यासाठी गणेशोत्सवाचा पहिला दिवसच का? राजकारणात वेळ, ठिकाण आणि प्रतीक यांना महत्त्व असते. त्यामुळे या कार्यक्रमाच्या वेळेबद्दल प्रश्न विचारले जाणे स्वाभाविक आहे. विशेषतः मुंबईत रिक्षा-टॅक्सी चालकांच्या भाषेचा प्रश्न तापलेला असताना आणि मराठी-अमराठी वादाला राजकीय रंग चढलेला असताना हा कार्यक्रम अधिक संवेदनशील ठरतो. कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर कायदा-सुव्यवस्थेचीही विशेष तयारी सुरू असल्याचे वृत्त आहे. फडणवीस सरकारने म्हणूनच स्वतःला एक साधा प्रश्न विचारला पाहिजे महाराष्ट्राचा मुख्यमंत्री म्हणून तुमची पहिली राजकीय जबाबदारी महाराष्ट्राच्या भाषिक-सांस्कृतिक संवेदनशीलतेची आहे की केंद्राच्या प्रत्येक राजकीय-सांस्कृतिक उपक्रमाला महाराष्ट्रात निर्विघ्न व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची? केंद्र आणि राज्य यांच्यात संघर्ष असावा, असे कुणी म्हणत नाही. पण संघराज्यव्यवस्थेत राज्य सरकारचे स्वतःचे सांस्कृतिक आणि भाषिक भान असते. महाराष्ट्राच्या राज्यभाषेचा प्रश्न हा केवळ भावनेचा विषय नाही; तो राज्याच्या प्रशासनिक ओळखीचाही विषय आहे. फडणवीस सरकारला जर खरोखर मराठीला सर्वोच्च स्थान द्यायचे असेल, तर त्याची कसोटी फक्त विधानसभेतील भाषणांमध्ये किंवा घोषणांमध्ये होऊ शकत नाही. कसोटी निर्णयांच्या सातत्याची असते. सरकारी कर्मचाऱ्यांची हिंदी परीक्षा रद्द करणे हा मराठीच्या प्रशासनिक स्थानाला बळ देणारा निर्णय आहे. रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी शिकण्याची मुदतवाढ देणे हा वेगळा संदेश देतो. आणि त्याच वेळी मुंबईच्या वेशीवर हिंदीचे राष्ट्रीय राजभाषा संमेलन आयोजित होत असेल तर जनतेला प्रश्न पडणारच. हा प्रश्न फडणवीस सरकारने टाळू नये. कारण महाराष्ट्राला हिंदीशी युद्ध नको आहे. महाराष्ट्राला कोणत्याही भारतीय भाषेशी वैर नाही. पण महाराष्ट्राच्या राजधानीत मराठीला राजकीयदृष्ट्या दुय्यम भासवणारे कोणतेही समीकरण महाराष्ट्र स्वीकारणार नाही. फडणवीस हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत. त्यामुळे दिल्लीच्या राजभाषा धोरणाचे प्रतिनिधी असण्यापेक्षा महाराष्ट्राच्या भाषिक अस्मितेचे संवैधानिक संरक्षक म्हणून त्यांची भूमिका अधिक स्पष्ट दिसली पाहिजे.

हिंदीचे संमेलन मुंबईत होत आहे म्हणून मराठी संपणार नाही. पण मराठीच्या नावाने सत्ता मिळवून, सत्तेत आल्यानंतर मराठीच्या संवेदनशील प्रश्नांवर संदिग्ध भूमिका घेतली गेली, तर जनतेचा प्रश्न अधिक बोचरा असेल फडणवीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत तरी नेमके महाराष्ट्रासाठी, की हिंदी राजभाषेच्या विस्तारासाठी महाराष्ट्राचे राजकीय सूत्रधार? या प्रश्नाचे उत्तर घोषणा देऊन नव्हे, तर कृतीतून द्यावे लागेल. कारण भाषा केवळ शब्द नसते. भाषा म्हणजे ओळख, इतिहास आणि आत्मसन्मान असतो. आणि महाराष्ट्राच्या बाबतीत त्या आत्मसन्मानाचे नाव मराठी!

## मोशी कचरा डेपोतील ९ मृत्यूंपासून 'बोगस वीजनिर्मिती' पर्यंत; ४५०-५०० कोटींच्या व्यवहारांचा संशय, महापालिका-कंत्राटदारांच्या संगनमताची चौकशी कधी?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

प्रमुख मुद्दे : ✻ ९ कामगारांचा मृत्यू : ८ जुलै २०२६ रोजी मुसळधार पावसात मोशी कचरा डेपोतील कचऱ्याचा ढिगारा कोसळून ९ कंत्राटी कामगारांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेने डेपोतील सुरक्षा, कचरा व्यवस्थापन आणि कंत्राटी यंत्रणेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले.

**✻ ४५०-५०० कोटींच्या व्यवहारांवर संशय** : महापालिका आणि संबंधित कंत्राटदार कंपन्यांमध्ये झालेल्या व्यवहारांमध्ये आर्थिक व पर्यावरणीय अनियमितता झाल्याचा आरोप आहे. या आरोपांची स्वतंत्र आर्थिक आणि तांत्रिक तपासणी आवश्यक आहे.

**✻ वीजनिर्मितीच्या दाव्यावर प्रश्नचिन्ह** : संबंधित कंपन्यांकडून दरमहा 14 MW वीजनिर्मितीचा दावा करण्यात आल्याचे सांगितले जाते. त्याआधारे मोठ्या रकमेची बिले वसूल झाल्याचा आरोप आहे.

**✻ मीटर तपासणीचा मुद्दा** : महावितरणच्या ग्रिड मीटर तपासणीत प्रत्यक्ष निर्मिती 3 MWच्या आसपास असल्याचा दावा केला जात आहे. त्यामुळे 14 MW विरुद्ध 3 MW या आकडेवारीतील फरकाची स्वतंत्र तांत्रिक चौकशी अत्यावश्यक ठरते.

**✻ ४६.५० कोटींच्या बिलांचा सवाल** : 14 MWच्या दाव्याच्या आधारे सुमारे ४६.५० कोटींचे बोगस बिलिंग झाल्याचा आरोप आहे. या रकमेची देयके, मीटर रेकॉर्ड, करारातील अटी आणि प्रत्यक्ष वीज निर्मिती यांची फेरतपासणी होणे गरजेचे आहे.

**✻ कचऱ्याचे वजन फुगवण्याचा आरोप** : प्रति टन वाहतूक किंवा प्रक्रिया शुल्क वाढवण्यासाठी ओल्या कचऱ्यात दगड, माती आणि बांधकामाचा राडारोडा मिसळल्याचा आरोप आहे. वजनकाट्यांचे रेकॉर्ड, CCTV फुटेज आणि वाहतूक नोंदी तपासल्यास सत्य स्पष्ट होऊ शकते.

**✻ नियमबाह्य बांधकामाचा प्रश्न** : कचऱ्याच्या मुख्य साठ्यापासून आवश्यक अंतर राखण्याच्या नियमांकडे दुर्लक्ष करून इमारत कचऱ्याच्या जवळ उभारण्यात आल्याचा आरोप आहे. या बांधकामास कोणाची मंजुरी होती, हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

**✻ एमईआरसी याचिकेचा गंभीर मुद्दा** : महावितरणने वीज बिलाबाबत आक्षेप घेतल्यानंतर २७ ऑगस्ट २०२४ रोजी तत्कालीन आयुक्तांच्या स्वाक्षरीने MERCकडे याचिका दाखल झाल्याचा दावा आहे. त्या याचिकेचा मूळ मसुदा, फाईल नोटिंग, स्वाक्षरीची प्रक्रिया आणि अधिकाऱ्यांची भूमिका तपासणे आवश्यक आहे.

**✻ तत्कालीन आयुक्तांच्या स्वाक्षरीचा गैरवापर?** : तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांच्या स्वाक्षरीचा वापर करून त्यांची दिशाभूल करण्यात आली का, याचा तपास व्हायला हवा. पर्यावरण विभागाचे तत्कालीन प्रमुख संजय कुलकर्णी यांची भूमिका या संदर्भात तपासाच्या कक्षेत येते, असा आरोप आहे.

**✻ कंत्राटदार कंपन्यांची भूमिका** : BVG India, AG Environment Infra आणि Antony Lara Renewable Energy या कंपन्यांशी संबंधित करार, कामाचे आदेश, बिलिंग, वीज निर्मितीची आकडेवारी, कचऱ्याचे वजन आणि प्रत्यक्ष काम यांचा परस्परसंबंध तपासणे आवश्यक आहे.

**सर्वात मोठा सवाल**

14 MW वीजनिर्मितीचा दावा आणि प्रत्यक्ष 3 MW निर्मितीचा दावा यातील तब्बल ११ चथचा फरक नेमका कुठे गेला?

आणि त्याहून गंभीर प्रश्न म्हणजे मोशीतील ९ कामगारांचा जीव गेला, त्याआधी आणि त्यानंतर कचरा व्यवस्थापनातील नियम, कंत्राटी अटी, वजन नोंदी, वीजनिर्मितीचे मीटर आणि कोट्यवधींचे बिलिंग यांची जबाबदारी नेमकी कोणाची होती?

या सर्व बाबी अधिकृत कागदपत्रे, महावितरणचे मीटर रेकॉर्ड, महापालिकेच्या फाईल नोटिंग, कंत्राटी करार, देयक नोंदी आणि चौकशी अहवाल यांच्या आधारे तपासल्या गेल्या तरच आरोपांचे वास्तव स्पष्ट होईल. त्यामुळे हे प्रकरण केवळ प्रशासकीय चौकशीपुरते न ठेवता, दोष आढळल्यास संबंधितांवर फौजदारी, आर्थिक आणि जबाबदारी निश्चित करणारी कारवाई करण्याची मागणी पुढे येते.

## 'ठेकेदारांना पाठीशी का घालता?' शैलजा मोरेंचा प्रशासनाला खडा सवाल

### स्मशानभूमी, विद्युत दाहिन्यांच्या दुरवस्थेवरून महापालिका सभेत खडाजंगी; 'बजेट नाही'च्या कारणावर अभिषेक बारणेंचीही तंबी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

शहरातील स्मशानभूमी, शवदाहिनी आणि विद्युत दाहिन्यांच्या देखभाल-दुरुस्तीकडे ठेकेदारांकडून होत असलेल्या कथित दुर्लक्षावरून महापालिका प्रशासनाला बुधवारी चांगलेच धारेवर धरण्यात आले. 'कामचुकार ठेकेदारांवर कारवाई करण्याऐवजी अधिकारी त्यांना पाठीशी का घालत आहेत?' असा संतप्त सवाल माजी उपमहापौर शैलजा मोरे यांनी उपस्थित केल्याने प्रभाग क्रमांक १५च्या ऑनलाइन सर्वसाधारण सभेत चांगलाच गदारोळ झाला.

शहरातील अंत्यविधीसाठी महत्त्वाच्या असलेल्या विद्युत दाहिन्या आणि शवदाहिन्या वेळेवर दुरुस्त होत नसल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याचा मुद्दा मोरे यांनी उपस्थित केला. एखाद्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलेला असताना अंत्यविधीसाठीही प्रशासनाच्या दिरंगाईची प्रतीक्षा करावी लागणे, ही गंभीर बाब आहे, असे त्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले.

किरकोळ दुरुस्तीची कामेही सर्वसाधारण सभेच्या मंजुरीच्या प्रक्रियेत अडकवली जात असल्याने नागरिकांना ताटकळत ठेवले जात असल्याचा आरोप करण्यात आला. त्यामुळे प्रश्न केवळ निधीचा नसून प्रशासकीय प्राधान्यक्रम आणि निर्णयक्षमतेचाही आहे, अशी नाराजी व्यक्त झाली. दरम्यान, प्रभाग क्रमांक १५मधील उद्यानांच्या दुरवस्थेचाही मुद्दा सभेत गाजला. मुलांची खेळणी तुटलेली, पेव्हिंग ब्लॉक उखडलेले आणि झाडांची नासधूस झालेली असतानाही त्याकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याची तक्रार करण्यात आली. नागरिकांच्या मूलभूत सुविधांबाबत विचारणा केली की प्रशासनाकडून 'बजेट नाही' हे नेहमीचे उत्तर दिले जाते, असा आरोप मोरे यांनी केला. या भूमिकेला स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनीही आक्षेप घेत प्रशासनाला सुनावले. 'बजेट नाही' हे प्रत्येक प्रश्नावरचे तयार उत्तर असू शकत नाही, अशा शब्दांत त्यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली आणि विकासकामांना गती देण्याचे निर्देश दिले.

## आमदार शंकर जगतापकडून रावेत, किवळे-मामुर्डीकरांच्या समस्यांचे 'फास्ट ट्रॅक' निराकरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी : प्रतिनिधी



नागरिकांच्या समस्या थेट जाणून घेऊन त्यांचे जलदगतीने निराकरण करण्यासाठी चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांच्या पुढाकारातून रावेत येथे आयोजित करण्यात आलेल्या 'आमदार आपल्या दारी' उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. समीर लॉन्स येथे झालेल्या जनसंवाद कार्यक्रमात आमदार जगताप यांनी सुमारे ७१५ नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकून घेत, संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून तातडीने कार्यवाहीच्या सूचना दिल्या.

पाणीपुरवठा, रस्ते, ड्रेनेज, वीजपुरवठा, वाहतूक, अतिक्रमण, कचरा व्यवस्थापन, रेशनकार्ड, संजय गांधी निराधार योजना तसेच विविध शासकीय योजनांशी संबंधित तक्रारी नागरिकांनी मांडल्या. तत्काळ सोडवता येणाऱ्या प्रश्नांवर जागेवरच कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले, तर तांत्रिक किंवा प्रशासकीय प्रक्रिया आवश्यक असलेल्या प्रश्नांचा कालबद्ध पाठपुरावा करण्याच्या सूचना आमदारांनी दिल्या.

रावेतमधील फुटपाथवरील अतिक्रमणे हटविणे, वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या आठवडे बाजारांवर कारवाई करणे, रस्त्यांच्या दुतर्फा उभ्या राहणाऱ्या जड वाहनांवर नियंत्रण आणणे याबाबतही सूचना करण्यात आल्या. किवळे येथे ज्येष्ठांसाठी उद्यान, सेवा रस्त्यांचे डांबरीकरण, स्ट्रीट लाईट, डीपीमधील रस्ते, नियमित कचरा संकलन आणि सुरळीत पाणीपुरवठ्याच्या मागण्या नागरिकांनी केल्या. या उपक्रमात महापालिका, महसूल, महावितरण, पोलीस, अन्नधान्य वितरण, तहसील तसेच अन्य शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते. आरोग्य, पाणीपुरवठा, स्थापत्य, उद्यान, करसंकलन, नगररचना, विद्युत आणि पर्यावरण विभागांचे स्वतंत्र दालन उभारण्यात आले होते. त्यामुळे नागरिकांना विविध कार्यालयांच्या फेऱ्या न मारता एकाच ठिकाणी तक्रारी मांडता आल्या. नागरिकांनी आपल्या प्रश्नांसाठी शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवू नयेत, यासाठी थेट नागरिकांपर्यंत जाण्याचा माझा प्रयत्न आहे. प्रत्येक प्रश्नाला प्राधान्य देऊन ठोस आणि कालबद्ध कार्यवाही केली जाईल, असे आमदार शंकर जगताप यांनी सांगितले.

## सोसायट्यांवर एसटीपी शुल्काचा बोजा; महापालिकेच्या निर्णयाविरोधात रहिवासी आक्रमक!

### भाजपच्या बहुमताच्या जोरावर प्रस्ताव मंजूर; बिल्डरांच्या चुकांची शिक्षा नागरिकांना का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

शहरातील गृहनिर्माण सोसायट्यांवर एसटीपी (सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प) आणि जलनिःसारण जोडणी शुल्काचा अतिरिक्त आर्थिक भार टाकण्याच्या महापालिकेच्या निर्णयाविरोधात सोसायटीधारक आक्रमक झाले आहेत. २ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत सत्ताधारी भाजपने बहुमताच्या जोरावर हा प्रस्ताव मंजूर केल्याचा आरोप चिखली-मोशी-पिंपरी-चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशनने केला आहे.

या निर्णयामुळे शहरातील हजारो गृहनिर्माण सोसायट्या आणि त्यामध्ये राहणाऱ्या लाखो नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडण्याची शक्यता असल्याने संताप व्यक्त होत आहे. निर्णय मागे घेतला नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा फेडरेशनने दिला आहे.

फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी महापालिका प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. शहरातील हजारो सोसायट्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघटनेशी कोणतीही अर्थपूर्ण चर्चा न करता नागरिकांवर आर्थिक बोजा टाकण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. त्यामुळे 'नागरिकांचा सहभाग कुठे आहे?' असा सवाल उपस्थित होत आहे.

आधीच विविध प्रकारचे कर आणि शुल्क भरणाऱ्या सोसायट्यांवर एसटीपी आणि जलनिःसारणासाठी पुन्हा शुल्क आकारण्याची गरज काय, असा प्रश्न रहिवाशांकडून उपस्थित होत आहे. एकाच सुविधेसाठी नागरिकांकडून थेट किंवा अप्रत्यक्षपणे दुहेरी शुल्क आकारले जात आहे का? याचे स्पष्ट उत्तर महापालिकेने द्यावे, अशी मागणी होत आहे.

मात्र या संपूर्ण वादातील सर्वात गंभीर प्रश्न विकासकांच्या जबाबदारीचा आहे. अनेक प्रकल्पांमध्ये पायाभूत सुविधा अपुऱ्या किंवा निकृष्ट असतील, तर त्या स्थितीत संबंधित विकासकांना पूर्णत्वाचा दाखला कसा मिळाला? महापालिकेने बांधकाम आणि पायाभूत सुविधांची तपासणी कोणत्या निकषांवर केली? तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्यांची जबाबदारी काय? हे प्रश्न आता फेडरेशनने उपस्थित केले आहेत.

बिल्डरने चूक केली आणि त्याची किंमत सोसायटीधारकांनी मोजायची, हा न्याय कोणता? नागरिकांनी घर घेताना विकासकाला पैसे दिले, त्यानंतर महापालिकेचे कर भरले आणि आता त्याच पायाभूत सुविधांसाठी पुन्हा शुल्क भरायचे अशी परिस्थिती निर्माण होत असेल तर प्रशासनाने त्याचे स्पष्टीकरण देणे गरजेचे आहे.

महापालिकेने शुल्क आकारण्यामागील कायदेशीर आधार, त्याची गणना कशी केली, कोणत्या सोसायट्यांना किती शुल्क लागणार, आधी भरलेल्या शुल्काचे समायोजन होणार का आणि विकासकांकडून वसूल होणाऱ्या जबाबदाऱ्यांचे काय, याबाबत संपूर्ण माहिती सार्वजनिक करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. नागरिकांवर कोणताही अतिरिक्त आर्थिक भार टाकण्यापूर्वी त्यांची मते जाणून घेणे, संबंधित संस्थांशी चर्चा करणे आणि निर्णयामागील आर्थिक-तांत्रिक कारणे स्पष्ट करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. बहुमताच्या जोरावर प्रस्ताव मंजूर करणे आणि त्यानंतर नागरिकांनी तो निमूटपणे स्वीकारावा, अशी लोकशाहीची व्याख्या होऊ शकत नाही.

फेडरेशनने महापालिकेला स्पष्ट इशारा दिला आहे सोसायट्यांना सातत्याने वेठीस धरणे थांबवा; अन्यथा शहरातील सोसायट्या रस्त्यावर उतरतील.

आता महापालिकेसमोर दोन पर्याय आहेत नागरिकांच्या प्रश्नांवर संवाद साधून शुल्क धोरण पारदर्शक करणे किंवा आंदोलनाची ठिणगी पेटू देणे. हजारो सोसायट्या आणि लाखो मतदारांशी संबंधित हा प्रश्न असल्याने प्रशासन आणि सत्ताधारी पक्ष याकडे किती गांभीर्याने पाहतात, हे आगामी काळात स्पष्ट होणार आहे.

## ना खाऊंगा, ना खाने दूंगा'च्या नाऱ्याखाली लाचखोरीचा बाजार?

### पिंपरी-चिंचवड महापालिकेत एसीबीची कारवाई; भाजपच्या 'भ्रष्टाचारमुक्त' कारभारावर पुन्हा प्रश्नचिन्ह

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी

'ना खाऊंगा, ना खाने दूंगा' आणि 'भ्रष्टाचाराला शून्य सहनशीलता' अशा घोषणा देत स्वच्छ व पारदर्शक कारभाराचा दावा करणाऱ्या भाजपच्या सत्ताकाळात पिंपरी-चिंचवड महापालिकेतील लाचखोरीचा प्रश्न मात्र संपण्याचे नाव घेत नाही. सांगवी करसंकलन विभागातील लिपिक उमेश कुटे याला १ लाख ५० हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (अउइ) पकडल्याची घटना समोर आली आहे. या कारवाईने महापालिकेतील कथित भ्रष्टाचाराच्या व्यवस्थेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह उभे केले आहे.

एक-दोन कर्मचाऱ्यांवर एसीबीची कारवाई झाली म्हणजे संपूर्ण महापालिका भ्रष्ट आहे, असा सरसकट निष्कर्ष काढता येणार नाही. मात्र, महापालिकेच्या विविध विभागांतून वारंवार लाचखोरीच्या तक्रारी आणि एसीबीच्या कारवाया समोर येत असतील, तर त्यामागे केवळ व्यक्तींचा दोष आहे की व्यवस्थेतील काही मूलभूत त्रुटी आहेत, याचा शोध घेणे प्रशासनाची जबाबदारी आहे.

करसंकलन विभाग हा थेट नागरिकांच्या आर्थिक व्यवहाराशी संबंधित विभाग. मालमत्ता कर, करआकारणी, नोंदी, फेरफार आणि विविध प्रशासकीय प्रक्रियांमध्ये नागरिकांचा थेट संबंध येतो. अशा विभागातील कर्मचाऱ्यावर लाचेची कारवाई होणे ही केवळ एका कर्मचाऱ्यावरील कारवाई म्हणून झटकून चालणार नाही. नागरिकांना आपले वैध काम करून घेण्यासाठी 'अतिरिक्त पैसे' द्यावे लागतात का? हा प्रश्न प्रशासनाने गांभीर्याने तपासण्याची वेळ आली आहे.

विशेष म्हणजे, महापालिकेतील भ्रष्टाचारावर अंकुश ठेवण्याची जबाबदारी केवळ एसीबीची नाही. एसीबी लाच स्वीकारणाऱ्याला पकडू शकते; पण लाच मागण्याची वेळच नागरिकांवर येऊ नये, यासाठी व्यवस्था उभी करण्याची जबाबदारी महापालिका प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांची आहे.

महापालिकेतील विविध विभागांमध्ये यापूर्वीही भ्रष्टाचाराच्या तक्रारी आणि कारवाया झाल्या असतील, तर त्यांचे एकत्रित विश्लेषण करण्याची गरज आहे. कोणत्या विभागात सर्वाधिक तक्रारी आहेत? कोणत्या प्रकारच्या कामांसाठी लाच मागितल्याच्या तक्रारी येतात? एकाच स्वरूपाच्या तक्रारी वारंवार कोणत्या स्तरावर येतात? वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नियंत्रण कितपत प्रभावी आहे? या प्रश्नांची उत्तरे सार्वजनिक झाली पाहिजेत.

भ्रष्टाचाराविरोधात घोषणा देणे सोपे; पण भ्रष्टाचाराची साखळी तोडणे कठीण. एसीबीची कारवाई झाल्यानंतर काही दिवस राजकीय आरोप-प्रत्यारोप होतात आणि नंतर प्रकरण विस्मृतीत जाते, असे होणार असेल तर 'शून्य सहनशीलता' ही घोषणा केवळ फलकावरच राहणार आहे.

सत्ताधाऱ्यांनीही या घटनेकडे राजकीय बचावाच्या भूमिकेतून न पाहता प्रशासनिक जबाबदारी म्हणून पाहण्याची गरज आहे. लाचखोरीचा आरोप झालेल्या कर्मचाऱ्यावर कायदेशीर प्रक्रिया सुरू राहीलच; मात्र त्याला लाच मागण्याची संधी मिळाली कशी, संबंधित कामकाजावर कोणाचे पर्यवेक्षण होते आणि अशा प्रकारच्या तक्रारी यापूर्वी आल्या होत्या का, याचीही चौकशी झाली पाहिजे. नागरिकांना पारदर्शक सेवा देण्यासाठी ऑनलाइन प्रक्रिया, निश्चित कालमर्यादा, फाईल ट्रॅकिंग, अधिकाऱ्यांची जबाबदारी आणि तक्रार निवारण व्यवस्था प्रभावी करणे आवश्यक आहे. अन्यथा 'डिजिटल महापालिका'च्या घोषणा आणि कार्यालयाच्या दारात लाचेच्या मागण्या, हा विरोधाभास कायम राहणार. 'ना खाऊंगा, ना खाने दूंगा' हा नारा महापालिकेच्या भिंतीवर लिहिण्यापेक्षा तो प्रत्यक्ष कारभारात दिसणे महत्त्वाचे आहे. सांगवीतील कारवाईनंतर आता प्रश्न केवळ उमेश कुटेपर्यंत मर्यादित नाही. प्रश्न आहे तो महापालिकेच्या संपूर्ण प्रशासकीय संस्कृतीचा. एसीबी कारवाई करत राहणार आणि महापालिका केवळ स्पष्टीकरणे देत राहणार, की या घटनेतून धडा घेऊन लाचखोरीला पोषक ठरणाऱ्या व्यवस्थेवरच कठोर प्रहार केला जाणार? याचे उत्तर आता प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांनी नागरिकांना द्यावे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### ‘एमएच ६१ सी’ मालिकेतील पसंतीच्या क्रमांकांसाठी आजपासून अर्ज

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे । प्रतिनिधी

प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आरटीओ) ‘एमएच ६१’ या वाहन नोंदणी मालिकेअंतर्गत आता ‘एमएच ६१ सी ०००१’पासून दुचाकी वाहनांची नवीन मालिका सुरू करण्यात येत आहे. या मालिकेतील आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक घेऊ इच्छिणाऱ्या वाहनधारकांना नियमित शुल्काच्या तीनपट रक्कम भरून अर्ज करता येणार आहे.

पसंतीचे क्रमांक घेण्यासाठी ४ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.३० या वेळेत अर्ज स्वीकारले जाणार आहेत. मुदतीत आलेल्या अर्जांची यादी त्याच दिवशी सायंकाळी प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानंतर ७ सप्टेंबर रोजी दुपारी ३.१५ पर्यंत लिलावासाठी डीडी स्वीकारले जातील आणि सायंकाळी ४ वाजता सहकार सभागृहात लिलाव प्रक्रिया होणार आहे.

लिलावात एखाद्या क्रमांकासाठी एकापेक्षा अधिक अर्ज आल्यास संबंधित क्रमांकासाठी लिलाव पद्धतीने क्रमांक निश्चित केला जाईल. एका क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्जदारांनी समान रक्कम भरल्यास लॉटरी पद्धतीने निर्णय घेतला जाणार आहे. लिलावासाठी पाच हजार रुपयांचा डीडी सादर करणे आवश्यक आहे. लिलावानंतर शिल्लक राहिलेल्या पसंतीच्या क्रमांकांसाठी ८ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.३० या वेळेत अर्ज स्वीकारले जातील. त्यानंतर दुपारी ३.१५ पर्यंत डीडी स्वीकारून सायंकाळी ४ वाजता लॉटरी काढली जाईल.

# खेड्यापाड्यातही मोठ्या गणेशमूर्तींची धूम!

## आंबेगाव तालुक्यात पीओपीसह शाडूच्या मूर्तींना मागणी; कारखान्यांमध्ये तयारी अंतिम टप्प्यात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी । प्रतिनिधी

येत्या काही दिवसांत सुरू होणाऱ्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आंबेगाव तालुक्यातील शहरी तसेच ग्रामीण भागातील गणेशमूर्ती कारखान्यांमध्ये लगबग वाढली आहे. गणेशमूर्तींची निर्मिती, रंगकाम, सजावट आणि वस्त्रांच्या नक्षीकामाचे काम अंतिम टप्प्यात आले असून, कारागीर दिवस-रात्र मेहनत घेत आहेत. यंदा पीओपीसह शाडूच्या गणेशमूर्तींनाही चांगली मागणी असल्याचे मूर्तिकारांनी सांगितले.

आंबेगाव तालुक्यातील विविध कारखान्यांमध्ये मंडळांच्या मागणीनुसार मोठ्या आकाराच्या आकर्षक गणेशमूर्ती तयार केल्या जात आहेत. नैसर्गिक रंगांचा वापर तसेच पारंपरिक रूपातील मूर्तींना नागरिकांकडून पसंती मिळत आहे. अनेक गणेश मंडळे आणि घरगुती गणेशभक्तांनी मूर्तींचे आगाऊ बुकिंग केले असून, ग्राहकांच्या पसंतीनुसार विशेष मूर्ती साकारण्यात येत आहेत.

गावडेवाडी (ता. आंबेगाव) येथील श्रीधर आप्पा राजगुरू आणि प्रथमेश श्रीधर राजगुरू हे जिल्ह्यातील विविध भागांत घाऊक गणेशमूर्तींचा पुरवठा करतात. त्यांच्या कारखान्यात सध्या सुमारे तीन हजार गणेशमूर्ती तयार असून, त्यांचे रंगकाम आणि सजावटीचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.

याबाबत प्रथमेश श्रीधर राजगुरू म्हणाले, कारखान्यात तयार करण्यात आलेल्या मूर्ती ग्राहकांच्या मागणीनुसार बनविण्यात आल्या आहेत. यंदा १० ते २५ हजार रुपये किमतीच्या मोठ्या गणेशमूर्तींना मंडळांकडून विशेष मागणी आहे. त्याचबरोबर शाडूच्या तसेच घरगुती गणेशमूर्तींनाही चांगला प्रतिसाद मिळत आहे.

### आकर्षक रंगसंगतीमुळे पीओपीला मागणी

कमी वजन, आकर्षक रंगसंगती आणि तुलनेने परवडणारी किंमत यामुळे पीओपीच्या मूर्तींना ग्रामीण भागातील बाजारपेठेतही मागणी कायम आहे. प्रशासनाकडून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे आवाहन केले जात असले तरी पीओपीच्या मूर्तींची मागणी यंदाही वाढण्याची शक्यता असल्याचे मूर्तिकारांचे म्हणणे आहे.

दरम्यान, कच्च्या मालाच्या वाढलेल्या किमती आणि मजुरीतील वाढ यामुळे यंदा गणेशमूर्तींच्या दरात वाढ होण्याची शक्यता आहे. गणेशमूर्तींच्या विक्रीत यंदा सुमारे १५ ते २० टक्के वाढ होण्याची अपेक्षा असल्याचे श्रीधर राजगुरू यांनी सांगितले.

### पर्यावरणपूरक मूर्तींचे आवाहन

एकीकडे मोठ्या आणि आकर्षक पीओपी मूर्तींची मागणी वाढत असताना दुसरीकडे पर्यावरणप्रेमींकडून जलप्रदूषणाचा मुद्दा उपस्थित केला जात आहे. पीओपीच्या मूर्तींच्या विसर्जनामुळे जलस्रोतांवर होणारा परिणाम लक्षात



घेता शाडू मातीच्या तसेच पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचा वापर करावा, असे आवाहन पर्यावरणप्रेमींकडून करण्यात येत आहे.

गणेशोत्सवाची चाहूल लागताच ग्रामीण भागातील बाजारपेठाही सजू लागल्या असून, मंडळांच्या मोठ्या मूर्तींपासून घरगुती गणेशमूर्तींपर्यंत मागणी वाढल्याने मूर्तिकार आणि कारागिरांच्या हाताला काम मिळाले आहे. आता गणरायाच्या आगमनाची भक्तांना प्रतीक्षा लागली आहे.

# अवघा एक मिनिट उशीर अन् १२५ विद्यार्थ्यांना तासनतास उभे!

## लोणी काळभोरच्या एमआयटी स्कूलमध्ये ‘हुकूमशाही’ कारभाराचा आरोप; पालकांचा संताप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी काळभोर (पुणे) : प्रतिनिधी

शाळेत पोहोचण्यास अवघा एक मिनिट उशीर झाल्याच्या कारणावरून तब्बल १२५ ते १५० विद्यार्थ्यांना गेटबाहेर तासनतास उभे ठेवण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार लोणी काळभोर येथील एमआयटी स्कूलमध्ये घडल्याचा आरोप पालकांनी केला आहे. या प्रकारामुळे पालकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला असून, शाळा प्रशासनाच्या शिस्तीच्या पद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

शाळेत वेळेवर पोहोचण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देणे आवश्यक असले, तरी अवघ्या एका मिनिटाच्या विलंबासाठी शेकडो विद्यार्थ्यांना दीर्घकाळ गेटबाहेर उभे ठेवणे योग्य आहे का? असा सवाल संतप्त पालकांनी उपस्थित केला आहे.

पालकांच्या म्हणण्यानुसार, विद्यार्थ्यांना गेटबाहेर ताटकळत ठेवण्यात आल्याने अनेक मुलांना शारीरिक त्रास सहन करावा लागला. लहान मुलांना अशा प्रकारे दीर्घकाळ उभे करणे हा शिस्तीचा भाग नसून त्यांच्या मानसिक आणि शारीरिक सुरक्षिततेचा प्रश्न असल्याचे पालकांचे म्हणणे आहे.

या घटनेनंतर पालकांनी शाळा प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. शिस्तीच्या नावाखाली विद्यार्थ्यांना शिक्षा देण्याची ही पद्धत ‘हुकूमशाही वृत्ती’ दर्शवणारी असल्याचा आरोप पालकांनी केला आहे.

शाळेत शिस्त असणे गरजेचे आहे. मात्र शिस्त आणि शिक्षा यामध्ये फरक असतो. विद्यार्थ्यांना वेळेचे महत्त्व समजावून सांगण्यासाठी समुपदेशन, पालकांशी संवाद किंवा अन्य शैक्षणिक उपायांचा वापर करता येऊ शकतो. त्याऐवजी मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांना एकत्रितपणे ताटकळत ठेवणे हा प्रश्न अधिक गंभीर बनवतो.

विशेष म्हणजे, या निर्णयाची जबाबदारी नेमकी कोणाची होती? विद्यार्थ्यांना किती वेळ उभे ठेवण्यात आले? त्या काळात त्यांच्या पिण्याच्या पाण्याची, स्वच्छतागृहाची आणि आरोग्याची व्यवस्था करण्यात आली होती का? या प्रश्नांची उत्तरे शाळा प्रशासनाने देणे आवश्यक आहे.

पालकांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून विद्यार्थ्यांशी अशा प्रकारे वर्तन करण्यामागील कारण स्पष्ट करण्याची मागणी केली आहे. भविष्यात अशा प्रकारची घटना पुन्हा घडू नये, यासाठी स्पष्ट आणि विद्यार्थीहितैषी नियमावली करण्याचीही मागणी होत आहे.

एक मिनिटाच्या उशिरासाठी एवढी मोठी शिक्षा का? हा प्रश्न आता पालकांकडून विचारला जात आहे. शिस्तीच्या नावाखाली विद्यार्थ्यांच्या सन्मानाला आणि सुरक्षिततेला धक्का बसत नसेल ना, याचा विचार शाळा प्रशासनाने करणे गरजेचे आहे.

या प्रकरणावर शाळा प्रशासनाची अधिकृत भूमिका काय आहे, तसेच विद्यार्थ्यांना नेमका किती वेळ गेटबाहेर ठेवण्यात आले होते, याबाबत स्पष्टता आल्यानंतरच या घटनेचे संपूर्ण चित्र समोर येणार आहे.

# युट्यूबर संतोष पंडित यांना मध्यरात्रीच पोलिसांनी उचललं; मंत्री चंद्रकांत पाटलांवरील ‘तो’ आक्षेपार्ह व्हिडीओ भोवला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याबाबत सोशल मीडियावर आक्षेपार्ह आणि अश्लील मजकूर प्रसारित केल्याप्रकरणी पुण्यातील युट्यूबर संतोष पंडित यांना पोलिसांनी मध्यरात्री अटक केली आहे. कोथरूड पोलिसांच्या पथकाने सुमारे एक वाजण्याच्या सुमारास पंडित राहत असलेल्या ठिकाणी धडक देत त्यांना ताब्यात घेतले.



कोथरूड परिसरातील विकासकामांबाबत प्रश्न उपस्थित करणारा व्हिडीओ संतोष पंडित यांनी आपल्या यूट्यूब अकाउंटवर प्रसारित केला होता. या व्हिडीओमध्ये मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याबाबत आक्षेपार्ह तसेच अश्लील शेरेबाजी करण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रकाराची दखल घेत एका महिलेने कोथरूड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.

तक्रारीच्या आधारे पोलिसांनी संतोष पंडित यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला. त्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत बुधवारी रात्री उशिरा पंडित याच्या ठिकाणाचा शोध घेतला. पहाटे सुमारे १.०० वाजता कोथरूड पोलिसांचे पथक त्याच्या निवासस्थानी पोहोचले आणि त्याला अटक केली. दरम्यान, चंद्रकांत पाटील यांच्याबाबत सोशल मीडियावर आक्षेपार्ह मजकूर आणि व्हिडीओ प्रसारित केल्याप्रकरणी सारिका कांबळे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ‘संतोष पंडित ६२७८’ या यूट्यूब अकाउंटवरून चंद्रकांत पाटील तसेच मिताली साळवेकर यांच्याबाबत आक्षेपार्ह स्वरूपाचा मजकूर व व्हिडीओ प्रसारित करण्यात आला. संबंधित पोस्टला मोठ्या प्रमाणावर व्ह्यूज मिळाल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी कोथरूड पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ०३६१/२०२६ नोंद करण्यात आला असून भारतीय न्याय संहितेतील कलम ७५(१)(ळीं), ७५(३), ३५६(२), ३५२ तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमातील कलम ६७ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. ३ सप्टेंबरला गुन्ह्याची नोंद झाल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

याआधीही दोन दिवसांपूर्वी चंद्रकांत पाटील यांच्याबाबत सोशल मीडियावर अवमानकारक मजकूर आणि अश्लील भाषेतील व्हिडीओ प्रसारित केल्याप्रकरणी डेक्कन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाली होती. भाजप नगरसेवक सुनील पांडे यांच्या तक्रारीवरून दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. ‘राजकारण एक्सप्रेस’ या सोशल मीडिया हँडलवरून हा व्हिडीओ प्रसारित झाल्याचा आरोप करण्यात आला होता.

एकाच व्यक्तीविरोधात चंद्रकांत पाटील यांच्याशी संबंधित सोशल मीडिया प्रकरणात पुन्हा तक्रार दाखल झाल्याने या प्रकरणाला आता वेगळे राजकीय वळण मिळण्याची शक्यता आहे.

सोशल मीडियावर राजकीय नेत्यांविरोधात आक्षेपार्ह मजकूर प्रसारित करणाऱ्यांविरोधात पोलिसांकडून कठोर कारवाईचा इशारा दिला जात असतानाच संतोष पंडित यांच्या अटकेमुळे पुण्यातील राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे. या संपूर्ण प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक अनिल शिवाजी माने यांच्या मार्गदर्शनाखाली कोथरूड पोलिसांकडून सुरू आहे.

# काठापूर बुद्रुकमध्ये पिंजऱ्यात मादी बिबट्या जेरबंद

## मादी बिबट्याचे वय अंदाजे दीड वर्ष; परिसरात आणखी बिबट्या असल्याचा ग्रामस्थांचा दावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर : प्रतिनिधी

काठापूर बुद्रुक (ता. आंबेगाव) येथे किसन नथु वायाळ यांच्या घराशेजारी वारंवार बिबट्याचे दर्शन होत असल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. वायाळ यांच्या मागणीनंतर दोन दिवसांपूर्वी वन विभागाने त्यांच्या घरासमोरील शेतात पिंजरा लावला होता. अखेर या पिंजऱ्यात मादी बिबट्या जेरबंद करण्यात वन विभागाला यश आले.



जेरबंद झालेल्या मादी बिबट्याचे वय अंदाजे एक ते दीड वर्ष असल्याचे वन विभागाकडून सांगण्यात आले. बिबट्या पकडण्यात आल्याने ग्रामस्थांना काहीसा दिलासा मिळाला असला, तरी या बिबट्याची आई अद्याप परिसरात असल्याचा दावा नागरिकांनी केला आहे.

काठापूर बुद्रुक परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर जाणवत असल्याने शेतकरी, नागरिक तसेच पशुधनाच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. शेतात काम करण्यासाठी जाणाऱ्या शेतकऱ्यांमध्येही भीतीचे वातावरण आहे.

एक बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद झाला असला तरी परिसरातील बिबट्याचा धोका पूर्णपणे टळलेला नाही, अशी ग्रामस्थांची भावना आहे. त्यामुळे वन विभागाने परिसरात नियमित गस्त वाढवावी, बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवावे आणि आणखी बिबट्या आढळल्यास तातडीने पिंजरा लावून त्याला जेरबंद करावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

एक बिबट्या पकडला असला तरी दुसरा बिबट्या परिसरात असल्याची भीती कायम आहे. वन विभागाने तातडीने उपाययोजना करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरतीची निवडयादी जाहीर, मुलाखतीविना निवड प्रकारात किती उमेदवारांना संधी?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

राज्यात पवित्र संकेतस्थळाद्वारे राबवण्यात येत असलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेअंतर्गत मुलाखतीविना निवड प्रकारात १३ हजार ११९ उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. जिल्हा परिषद शाळांसाठी सर्वाधिक ८४८१ उमेदवारांची निवड करण्यात आली असून, निवड झालेल्या उमेदवारांची कागदपत्र पडताळणी करून त्यांना लवकरात लवकर रुजू करून घेण्यासाठी वेळापत्रक जाहीर केले जाणार आहे.

शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी या बाबतची माहिती पत्रकार परिषदेत दिली. परीक्षा परिषदेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे, राज्य मंडळाचे अध्यक्ष डॉ. त्रिगुण कुलकर्णी, परीक्षा परिषदेचे आयुक्त महेश चोथे, राजेश शिंदे या वेळी उपस्थित होते. शिक्षक भरती प्रक्रियेअंतर्गत शाळा व्यवस्थापनांनी दिलेल्या जाहिरातीनुसार ३०,२०९ पदांसाठी प्रक्रिया राबवण्यात येत आहे. त्यासाठी उमेदवारांकडून प्राधान्यक्रम नोंदवून घेण्यात आले होते.

स्थानिक स्वराज्य संस्था, नगरपालिका-नगरपरिषद, महापालिका, आदिवासी विकास विभाग, शासकीय विद्यानिकेतन, खासगी अनुदानित शाळांमध्ये मुलाखतीविना निवड या प्रकारासाठी एकूण १९ हजार ७५४ जागा उपलब्ध होत्या. त्यापैकी १३ हजार ११९ जागांवर उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. इयत्ता पहिली ते पाचवीच्या वर्गांसाठी ७५४१, सहावी ते आठवीच्या वर्गांसाठी ४२०७, नववी ते दहावी या वर्गांसाठी ११११९, अकरावी ते बारावी या वर्गांसाठी २५२ उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. सिंह म्हणाले, निवड प्रक्रियेत प्रत्येक पदासाठीचे पात्रता गुण (कटऑफ) संकेतस्थळावर जाहीर करण्यात आले आहे.

# बोपोडीतील रेडीरेकनरचा दर वाढविण्यासाठी मुख्यमंत्र्यांची भेट घेणार

## उपमहापौर परशुराम वाडेकर यांचा पुढाकार; एसआयआर पुनर्वसनाला गती देण्याचा प्रयत्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

बोपोडी परिसरातील झोपडपट्टी पुनर्वसनाच्या कामांना गती देण्यासाठी येथील रेडीरेकनरचा दर वाढविण्याची मागणी राज्य सरकारकडे करण्यात येणार आहे. यासंदर्भात पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहेत.

उपमहापौर वाडेकर यांनी गुरुवारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे (डझअ) मुख्य कार्यकारी अधिकारी सतीश कुमार खडके, उपजिल्हाधिकारी अर्चना पाटील आणि सहाय्यक अधिकारी ऋषिकेश घाटे यांच्यासमवेत बोपोडी परिसराची पाहणी केली. सर्व्हे क्रमांक २३ व २४, नाईक चाळ, भोईटे चाळ, इंदिरा वसाहत, आदर्शनगर



तसेच सर्व्हे क्रमांक ५३ व ५४, मुंबई-पुणे रोड परिसराची पाहणी करण्यात आली.

बोपोडीचा सुमारे ७० टक्के भाग झोपडपट्टी क्षेत्रात येतो. मात्र, परिसरातील रेडीरेकनरचा दर तुलनेने कमी असल्याने डझअ प्रकल्प राबविताना विकासकांना अपेक्षित आर्थिक व्यवहार्यता मिळत नसल्याचे वाडेकर यांनी सांगितले. त्यामुळे अनेक विकासक या भागातील पुनर्वसन प्रकल्पांमध्ये सहभागी होण्यास उत्सुक नसल्याने पुनर्वसनाची प्रक्रिया रखडत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

रेडीरेकनरच्या दरात योग्य वाढ झाल्यास डझअ प्रकल्पांसाठी विकासकांना प्रोत्साहन मिळेल आणि रखडलेल्या पुनर्वसनाला गती मिळू शकेल. त्यातून झोपडपट्टीधारकांना चांगली घरे, मूलभूत सुविधा आणि नियोजनबद्ध विकास उपलब्ध करून देण्यास मदत होईल, असा दावा वाडेकर यांनी केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुणे शहर झोपडपट्टीमुक्त करण्याच्या संकल्पनेला गती देण्यासाठी बोपोडीतील रेडीरेकनर दरवाढ महत्त्वाची ठरू शकते.

यासंदर्भात लवकरच मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन रेडीरेकनर दरवाढीची मागणी ठोसपणे मांडणार असल्याचे वाडेकर यांनी स्पष्ट केले.

## सारांश वृत्त

### ४३ लाख कोटींच्या जीडीपी कपातीवर काँग्रेसचा सवाल; मोदी सरकारच्या आर्थिक आकडेवारीची विश्वासार्हता पुन्हा ऐरणीवर!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई : प्रतिनिधी

भारताच्या अर्थव्यवस्थेच्या आकाराच्या नव्या अंदाजावरून केंद्र सरकार आणि काँग्रेसमध्ये संघर्ष पेटला आहे. गेल्या चार वर्षांच्या जीडीपीच्या अंदाजात एकत्रित तब्बल ४३ लाख कोटींची घट करण्यात आल्याचा दावा काँग्रेसने केला असून, ही एवढी मोठी फेरआकडेमोड नेमकी का झाली, याचा खुलासा केंद्र सरकारने करावा, अशी मागणी काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी केली आहे.

रमेश यांनी गुरुवारी सरकारसमोर चार थेट प्रश्न उपस्थित केले. २०२२-२३ पासूनच्या चारही वर्षांच्या जीडीपीच्या अंदाजात मोठ्या प्रमाणावर खालील बाजूने बदल का करण्यात आले? नव्या पद्धतीतील कोणत्या घटकांमुळे हे बदल झाले? ही पद्धत निश्चित करताना कोणत्या तज्ज्ञांशी आणि संस्थांशी सल्लामसलत करण्यात आली? तसेच वास्तविक जीडीपी वाढ मोजताना वापरला जाणारा किंमत-घटक म्हणजेच 'डिफ्लेटर' महागाईचा परिणाम कमी दाखवत आहे का?'असे प्रश्न काँग्रेसने विचारले आहेत.

हा वाद केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोपांपुरता मर्यादित नाही. जीडीपीची गणना करण्याची पद्धत बदलली की आर्थिक वाढ, अर्थव्यवस्थेचा आकार, दरडोई उत्पन्न आणि सरकारच्या आर्थिक कामगिरीचे चित्रच बदलू शकते. विशेषतः सरकार एका बाजूला ७.८% आर्थिक वाढीचा दर भारताच्या मजबूत अर्थव्यवस्थेचे उदाहरण म्हणून मांडत असताना, दुसरीकडे मागील वर्षांच्या अंदाजात एवढ्या मोठ्या प्रमाणावर घट का झाली, हा काँग्रेसचा मुख्य आक्षेप आहे. त्यामुळे आता प्रश्न सरळ आहेआकडे बदलले असतील तर पद्धतही सार्वजनिक करा, कच्ची आकडेवारीही द्या आणि स्वतंत्र तज्ज्ञांकडून पडताळणी होऊ द्या.

कारण अर्थव्यवस्थेचा खरा विकास केवळ सरकारच्या प्रसिद्धीपत्रकात नव्हे, तर पारदर्शक आणि विश्वासार्ह आकडेवारीत दिसला पाहिजे.

# पदकांसाठी वयाची चोरी? भारताच्या क्रीडा व्यवस्थेला बनावट वयाच्या गैरप्रकाराचे ग्रहण!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली/ वृत्तसंस्था

भारताला जागतिक क्रीडा महासत्ता बनवण्याची स्वप्ने दाखवली जात असताना, देशाच्या क्रीडा व्यवस्थेतील एक गंभीर आणि लाजिरवाणा प्रकार समोर आला आहे खेळाडूंचे वय कमी दाखवून कनिष्ठ वयोगटातील स्पर्धांमध्ये सहभागी होण्याचा गैरप्रकार! जून २०२६ मध्ये गोंडा येथे झालेल्या १७ वर्षांखालील राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत ५०० हून अधिक कुस्तीपटूंना वयातील विसंगती आणि गैरप्रकारामुळे अपात्र ठरवण्यात आले. त्यामुळे हा एखाद्या एका स्पर्धेपुरता मर्यादित प्रकार नसून भारतीय क्रीडा व्यवस्थेत खोलवर रुजलेली समस्या असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

यापूर्वी शालेय फुटबॉलच्या प्रतिष्ठित सुब्रतो चषक स्पर्धेतही सुमारे २० संघांवर वयाच्या नियमांचे उल्लंघन केल्यामुळे कारवाई करण्यात आली होती. यामागे केवळ खेळाडू जबाबदार आहेत असे म्हणणे सोपे आहे; मात्र पालक, प्रशिक्षक, स्थानिक क्रीडा संघटना आणि प्रमाणपत्रांची पडताळणी करणारी यंत्रणा यांचीही जबाबदारी निश्चित करावी लागणार आहे.

वय कमी दाखवण्यामागे मुख्य कारण म्हणजे शारीरिक फायदा, निवड होण्याची अधिक शक्यता, शिष्यवृत्ती, आर्थिक मदत, प्रसिद्धी आणि भविष्यातील मोठ्या संधी. कनिष्ठ गटात वयाने मोठा खेळाडू उतरल्यास खऱ्या वयाच्या खेळाडूंवर अन्याय होतो. विशेषतः क्रिकेटसारख्या लोकप्रिय खेळांमध्ये कनिष्ठ स्तरावर मिळणारी आघाडी पुढे मोठ्या व्यावसायिक संधींचे दार उघडू शकते.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने वय पडताळणीसाठी हाडांच्या वाढीवर आधारित वैद्यकीय तपासणीची पद्धत लागू केली आहे. मात्र वैद्यकीय तपासणीही शंभर टक्के अचूक नसल्याने प्रश्न कायम आहे.

केंद्र सरकारने आता क्रीडा क्षेत्रातील वयाच्या गैरप्रकाराविरोधात राष्ट्रीय आचारसंहिता आणण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. केंद्रीकृत डिजिटल नोंदणी, कागदपत्रांची सुरक्षित पडताळणी, वैद्यकीय तपासणी आणि कठोर शिक्षेच्या माध्यमातून हा गैरप्रकार रोखण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

मात्र खरा प्रश्न असा आहेभारताला केवळ पदकांची संख्या वाढवायची आहे की प्रामाणिकपणे जिंकणारे खेळाडू घडवायचे आहेत? कारण वयाची चोरी थांबली नाही, तर मैदानावर पराभूत होणारा केवळ एक खेळाडू नसतो; पराभूत होते निष्पक्ष स्पर्धा आणि संपूर्ण क्रीडा व्यवस्थेवरील विश्वास!



## पाकिस्तानला लष्करी मदत नाहीच! बेल्जियमचे भारताला मोठे आश्वासन; राजनाथ सिंह यांनी उपस्थित केला तंत्रज्ञान सुरक्षेचा मुद्दा

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली (विशेष वृत्त)

पाकिस्तानला कोणत्याही प्रकारचे संरक्षण सहकार्य किंवा लष्करी तंत्रज्ञान पुरवले जाणार नाही, असे स्पष्ट आणि मोठे आश्वासन बेल्जियमने भारताला दिले आहे. भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि बेल्जियमचे संरक्षण मंत्री थिओ फ्रँकेन यांच्यात नवी दिल्लीत झालेल्या उच्चस्तरीय द्विपक्षीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

या महत्त्वपूर्ण बैठकीत राजनाथ सिंह यांनी बेल्जियन संरक्षण तंत्रज्ञान किंवा तांत्रिक कौशल्य पाकिस्तानच्या हाती जाण्याच्या शक्यतेबाबत भारताची गंभीर चिंता व्यक्त केली. यावर बेल्जियमचे संरक्षण मंत्री थिओ फ्रँकेन यांनी भारताची बाजू भक्कमपणे उचलून धरत, "पाकिस्तानसोबत संरक्षण सहकार्याचा प्रश्नच उद्भवत नाही; बेल्जियम पूर्णपणे भारताच्या पाठीशी उभा आहे," अशी ग्वाही दिली.

### भारत-युरोपियन युनियन धोरणात्मक भागीदारीला बळ

बैठकीदरम्यान बेल्जियमच्या संरक्षण मंत्र्यांनी भारत आणि युरोपियन युनियन मधील वाढत्या धोरणात्मक सहकार्याचा आवर्जून उल्लेख केला. सागरी सुरक्षा, माहिती सुरक्षा आणि एअरोस्पेस यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्रांत दोन्ही देशांमधील सहकार्य वेगाने विस्तारत असल्याचे त्यांनी सांगितले.

नवी दिल्लीत झालेल्या या चर्चेत दोन्ही देशांच्या संरक्षण औद्योगिक सहकार्याचा आढावा घेण्यात आला.

बेल्जियमचे प्रगत तंत्रज्ञान आणि भारताची उत्पादनाची विशाल क्षमता एकत्र आणून संरक्षण क्षेत्रात नवे करार आणि सामंजस्य करार करण्यात आले आहेत. या महत्त्वपूर्ण आश्वासनामुळे भारत आणि बेल्जियममधील राजनैतिक व लष्करी संबंध अधिक मजबूत झाले आहेत.

## 'मेड इन इंडिया' अन्नावर कॅनडाचा संशय! बनावट एक्सपायरी डेट प्रकरणाने भारताच्या खाद्य निर्यातीवर मोठा प्रश्नचिन्ह

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई / प्रतिनिधी

भारताच्या खाद्य उत्पादनांच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न निर्माण करणाऱ्या मुंबईतील बनावट लेबल प्रकरणाची दखल आता कॅनडानेही घेतली आहे. महाराष्ट्र एफडीएच्या धडक कारवाईत नवी मुंबईतील एका गोदामात कालबाह्य किंवा कालबाह्य होण्याच्या मार्गावर असलेल्या खाद्यपदार्थांवरील एक्सपायरी डेट आणि पोषणमूल्यांची माहिती बदलून त्यांना निर्यातीसाठी तयार केले जात असल्याचा प्रकार उघड झाला होता. या कारवाईत जवळपास ८० हजार डॉलर म्हणजे सुमारे ६६-७० लाख किमतीचा माल, बनावट लेबल तयार करण्यासाठी वापरलेली रसायने आणि प्रिंटिंग मशिनरी जप्त करण्यात आली.

धक्कादायक बाब म्हणजे या प्रकरणात PepsiCo, Nestle, Coca-Cola आणि Unilever यांसारख्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या उत्पादनांवरील लेबल बदलल्याचे आढळले. मात्र, या कंपन्यांवर कोणताही आरोप करण्यात आलेला नाही; तपासाचा केंद्रबिंदू अनधिकृत निर्यातदार आणि संबंधित रॅकेट आहे.

आता Canadian Food Inspection Agency (CFIA) या प्रकरणामुळे कॅनडात आयात होणाऱ्या खाद्यपदार्थांना कोणता धोका निर्माण होऊ शकतो, याचे मूल्यांकन करत आहे. कॅनडाने स्पष्ट केले आहे की या बनावट लेबल असलेल्या उत्पादनांनी कॅनडात प्रवेश केल्याचा सध्या कोणताही पुरावा नाही. मात्र, छाप्यात सापडलेल्या एका Kurkure पॅकेटवर इंग्रजी आणि फ्रेंच भाषेतील लेबल होते. कॅनडाच्या बाजारपेठेसाठी आवश्यक असलेल्या स्वरूपाशी ते साधर्म्य दाखवते.

यामुळे प्रश्न फक्त एका गोदामापुरता राहिलेला नाही. भारताच्या खाद्य निर्यातीच्या विश्वासार्हतेवरच प्रश्न उपस्थित झाला आहे. कालबाह्य मालाची तारीख बदलून तो परदेशी ग्राहकांच्या हातात पोहोचण्याची शक्यता असेल, तर हा केवळ व्यापारातील गैरप्रकार नसून सार्वजनिक आरोग्य आणि भारताच्या निर्यात प्रतिमेचा गंभीर मुद्दा आहे.

# राजीनामा देऊन चौकशीपासून पळणाऱ्या न्यायाधीशांना निवृत्तीचे लाभ का? सर्वोच्च न्यायालयाने केंद्राला मागितले उत्तर

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

न्यायव्यवस्थेतील गैरवर्तनाच्या आरोपांवर पारदर्शक चौकशी आणि उत्तरदायित्व टाळण्यासाठी राजीनामा देणाऱ्या न्यायाधीशांना निवृत्तीनंतरचे लाभ मिळावेत का? या अत्यंत गंभीर प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला उत्तर देण्याचे निर्देश दिले आहेत. गुरुवारी, ३ सप्टेंबर २०२६ रोजी, भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील तीन सदस्यीय खंडपीठाने केंद्राला नोटीस बजावली.

याचिकाकर्ते प्रतीक वोरा यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत मागणी केली आहे की, न्यायाधीश किंवा इतर घटनात्मक पदावरील व्यक्तीने गैरवर्तनाच्या आरोपांवरील पारदर्शक चौकशी अथवा पदावरून हटवण्याची घटनात्मक प्रक्रिया टाळण्यासाठी राजीनामा दिल्यास, त्यांना निवृत्तीवेतनासह विविध निवृत्तीविषयक सुविधा आणि लाभ नाकारले जावेत.

याचिकेतील युक्तिवाद अधिक गंभीर आहे. आरोपांचा सामना करण्याऐवजी राजीनामा देऊन पद सोडल्यासही संबंधित व्यक्तीला जवळपास तेच लाभ मिळत असतील, तर राजीनामा हा उत्तरदायित्वापासून बचावाचा मार्ग बनू शकतो, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.

या प्रकरणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे ते अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या अलीकडील राजीनाम्याच्या पार्श्वभूमीवर. त्यांच्याविरोधात चौकशी सुरू होती आणि संसदेमार्फत पदावरून हटवण्याची प्रक्रिया पुढे जात होती.

अशा परिस्थितीत राजीनामा दिल्यानंतरही संबंधित न्यायाधीशांना निवृत्तीचे लाभ मिळणार असतील, तर गंभीर आरोपांची संसदीय आणि न्यायिक प्रक्रिया प्रत्यक्षात किती प्रभावी राहते? हा मूलभूत प्रश्न या याचिकेमुळे पुन्हा ऐरणीवर आला आहे.

न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास टिकवायचा असेल, तर पदाचा राजीनामा हा चौकशीपासून सुटण्याचा मार्ग नसावा, अशी मागणी या प्रकरणातून पुढे येत आहे. आता सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर केंद्र सरकार यावर काय भूमिका मांडते, याकडे लक्ष लागले आहे.

# हनुमान चालीसा' प्रकरणात नवनीत राणांची अटक वैधच; मुंबई पोलिसांचा हायकोर्टात दावा

## एफआयआरच्या वेळेवर मात्र न्यायालयाचा सवाल; राज्य सरकारला प्रतिज्ञापत्राचे आदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

मुंबई / प्रतिनिधी : २०२२ मधील हनुमान चालीसा पठण प्रकरणात माजी खासदार नवनीत राणा यांना करण्यात आलेली अटक कायदेशीर आणि नियमांनुसारच होती, असा ठाम दावा मुंबई पोलिसांनी मुंबई उच्च न्यायालयात केला आहे. मात्र, प्रकरणातील एफआयआर नेमका कधी आणि किती वाजता दाखल करण्यात आला, याबाबत न्यायालयाने राज्य सरकारकडून स्पष्टता मागितली आहे. त्यामुळे पोलिसांच्या अटकेच्या दाव्यासोबतच एफआयआरच्या प्रक्रियेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या 'मातोश्री' निवासस्थानाबाहेर हनुमान चालीसा पठण करण्याची घोषणा केल्यानंतर नवनीत राणा आणि त्यांचे पती आमदार रवी राणा यांच्यावर खार पोलिसांनी कारवाई केली होती. या अटकेच्या वैधतेला आव्हान देत नवनीत राणा यांच्या वतीने उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे.

या याचिकेवरील सुनावणीदरम्यान मुंबई पोलिसांनी राणांच्या अटकेचे समर्थन केले. अटक करताना कायदेशीर प्रक्रियेचे पालन करण्यात आले असल्याचा पोलिसांचा युक्तिवाद आहे. मात्र, न्यायालयाने प्रकरणातील घटनाक्रम आणि एफआयआरच्या नोंदींबाबत काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले.

न्यायमूर्ती शिवकुमार डिगे यांच्या एकलपीठाने राज्य सरकारला विस्तृत प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. विशेषतः भारतीय दंड संहितेच्या कलम १५३ (अ) अंतर्गत दाखल झालेला एफआयआर नेमका कोणत्या तारीख व वेळेला नोंदविण्यात आला, याची माहिती प्रतिज्ञापत्रात देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सुनावणीदरम्यान न्यायालयाने राणा दाम्पत्याने प्रत्यक्षात 'मातोश्री'ला वेढा घातला होता का किंवा तेथे जाऊन हनुमान चालीसा पठण केले होते का, असा सवाल केला. यावर राणा यांच्या वकिलांनी नकारार्थी उत्तर दिले.

दरम्यान, विशेष न्यायालयाने २०२४ मध्ये राणा दाम्पत्याचा दोषमुक्तीचा अर्ज फेटाळला होता. त्याविरोधातील पुनरीक्षण याचिकेवर सुनावणी सुरू असताना उच्च न्यायालयाने हे निर्देश दिले.

आता २३ सप्टेंबरपर्यंत राज्य सरकारला आपली भूमिका स्पष्ट करावी लागणार आहे. त्यामुळे पुढील सुनावणीत एफआयआरची वेळ, अटकेची प्रक्रिया आणि पोलिसांच्या कारवाईची कायदेशीरता याबाबत आणखी महत्त्वाचे मुद्दे स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

# विद्यार्थ्यांना 'शिस्त' शिकवणाऱ्या भारतीय बार परिषदेचा सर्वोच्च न्यायालयाने घेतला वर्ग; कायद्याच्या विद्यार्थ्यांवर कारवाईचा अधिकारच नाही!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : वृत्तसंस्था

कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारायचे नाहीत, मत मांडायचे नाही, संघटित व्हायचे नाही आणि व्यवस्थेच्या निर्णयांवर आक्षेप घ्यायचा नाहीअशी काहींची अपेक्षा असेल, तर सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निर्णयाने त्या अपेक्षेलाच कायद्याचा आरसा दाखवला आहे. भारतीय बार परिषदेला कायद्याच्या विद्यार्थ्यांवर कोणतीही शिस्तभंगाची अथवा दंडात्मक कारवाई करण्याचा अधिकार नाही, असा स्पष्ट निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. अधिवक्ता अधिनियम, १९६१ अंतर्गत भारतीय बार परिषदेला मिळालेले शिस्तभंगविषयक अधिकार हे केवळ नोंदणीकृत वकिलांपुरते मर्यादित आहेत.

या निर्णयामुळे कायद्याच्या विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा आणि संघटित होण्याच्या अधिकाराचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. दोन माजी राष्ट्रीय विधी विद्यापीठ, हैदराबाद येथील पदवीधरांनी दाखल केलेल्या याचिकेच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने हा महत्त्वपूर्ण आदेश दिला. राष्ट्रीय विधी विद्यापीठातील २०२६च्या पदवीधर विद्यार्थ्यांच्या दीक्षान्त समारंभासाठी भारताच्या सरन्यायाधीशांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यास विद्यार्थ्यांनी आक्षेप घेतला होता. त्यानंतर भारतीय बार परिषदेकडून या विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक नोंदणीवर बंदी घालण्याच्या दिशेने हालचाल झाल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला होता.

म्हणजे प्रश्न केवळ एका दीक्षान्त समारंभाचा नव्हता; प्रश्न होता 'मतभेदाची किंमत काय?' याचा. विद्यार्थ्यांनी एखाद्या निर्णयावर आक्षेप घेतला म्हणून त्यांच्या भविष्यातील व्यावसायिक कारकिर्दीवरच गदा आणण्याचा प्रयत्न होत असेल, तर ही बाब केवळ विद्यापीठातील शिस्तीपुरती मर्यादित राहत नाही. ती थेट अभिव्यक्तिस्वातंत्र्य, संघटनस्वातंत्र्य आणि लोकशाहीतील असहमतीच्या अधिकाराशी जोडली जाते.

याचिकाकर्त्यांनी भारतीय बार परिषदेच्या पत्रव्यवहारामुळे विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचा गंभीर दावा केला होता. म्हणजेच कारवाई प्रत्यक्ष झाली नसली, तरी कारवाईची भीती निर्माण करून विद्यार्थ्यांना आपले मत व्यक्त करण्यापासून परावृत्त केले जाऊ शकते. कायद्याचे विद्यार्थी उद्या न्यायालयात नागरिकांच्या अधिकारांसाठी लढणार असतील, तर आज त्यांनाच प्रश्न विचारण्यापासून रोखण्याचा प्रयत्न कितपत योग्य, हा मूलभूत प्रश्न या प्रकरणाने उपस्थित केला.

सर्वोच्च न्यायालयाने मात्र भारतीय बार परिषदेच्या अधिकारक्षेत्राची मर्यादा स्पष्ट केली. अधिवक्ता अधिनियम, १९६१ अंतर्गत भारतीय बार परिषदेला मिळालेले शिस्तभंगाचे अधिकार हे नोंदणीकृत वकिलांशी संबंधित आहेत. कायद्याचे विद्यार्थी त्या अर्थाने नोंदणीकृत अधिवक्ता नसल्याने त्यांच्यावर या अधिकारांचा वापर करता येणार नाही, हा या निर्णयाचा गाभा आहे.

भारतीय बार परिषदेने विद्यार्थ्यांना शिस्त लावण्याच्या भूमिकेतून पाऊल टाकले; पण सर्वोच्च न्यायालयाने त्यालाच कायद्याची चौकट दाखवली. अधिकार मोठा असला म्हणून तो अमर्याद होत नाही, हा लोकशाहीतील अगदी प्राथमिक धडा आहे. विद्यार्थ्यांना कायदा शिकवणाऱ्या संस्थेने आधी स्वतः कायद्याची मर्यादा पाळावी, असा या निर्णयाचा उपरोधिक संदेश म्हणूनही त्याकडे पाहिले जात आहे.

या आदेशामुळे देशभरातील कायद्याच्या विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाचा संदेश गेला आहेप्रश्न विचारणे हा गुन्हा नाही आणि असहमती व्यक्त करणे म्हणजे शिस्तभंग नाही. विशेषतः कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी घटनात्मक मूल्यांवर चर्चा करणे, निर्णयांवर टीका करणे आणि आपली भूमिका मांडणे ही लोकशाही प्रक्रियेचीच एक बाजू आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या या भूमिकेमुळे भारतीय बार परिषदेच्या अधिकारांवर तर मर्यादा स्पष्ट झालीच; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे 'संस्था विरुद्ध विद्यार्थी' या संघर्षात कायद्याच्या नावाखाली अधिकाराचा अतिरेक किती धोकादायक ठरू शकतो, याची जाणीवही करून दिली आहे. कायद्याचा डंडा दाखवून विद्यार्थ्यांचा आवाज बंद करण्याचा प्रयत्न केला, तर शेवटी त्याच कायद्याचा धडा संस्थांनाही शिकावा लागतोराष्ट्रीय विधी विद्यापीठ प्रकरणाचा हा सर्वात महत्त्वाचा निष्कर्ष आहे.